**<u>ठळक बातम्या</u>**

- समुद्रापासून आकाशापर्यंत देश अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर होत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन/ गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी मातीच्या स्थानिक मूर्ती खरेदी करण्याचं केलं आवाहन

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी खेड्यांचा विकास केंद्रस्थानी असल्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांचं प्रतिपादन

- देशव्यापी पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेत राज्याचा सहभाग

**आणि**

- राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू

**<><><><><>**

भारत आज समुद्रापासून आकाशापर्यंत अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे पस्तीसाव्या भागात ते देशोदेशीच्या श्रोत्यांशी बोलत होते. जून महिन्यात विविध क्षेत्रात देशानं साध्य केलेल्या ऐतिहासिक यशाचा त्यांनी आढावा घेतला.

कोलकात्यात झालेल्या कार्यक्रमात आयएनएस दुनागिरी, आयएनएस संशोधक आणि आयएनएस अग्रय ही अद्ययावत जहाजं भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्याचं त्यांनी सांगितलं.

जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिनाचं यशस्वी आयोजन झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी सांगितलं, परदेशात अडीच हजारांपेक्षा जास्त ठिकाणी योगाभ्यास करण्यात आला. देशातही योगविषयक कार्यक्रमांमध्ये कोट्यवधी लोकांनी सहभाग घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

आपल्या कुटुंबातल्या लग्नसोहळ्याचा आनंद समाजाबरोबर वाटून घेण्याचा प्रयत्न म्हणून नांदेडच्या बहादूरपुरा गावातल्या पेटकर कुटुंबानं गावातल्या सुमारे साडेतीन हजार

लोकांच्या प्रत्येकी एक लाख रुपयांच्या अपघात विम्याची व्यवस्था केल्याचं उदाहरण त्यांनी श्रोत्यांना सांगितलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या या उपक्रमाची मन की बात मध्ये दखल घेतल्याबद्दल आनंद झाल्याची भावना अनुप पेटकर यांनी आकाशवाणीकडे व्यक्त केली आहे..

**- - - - होल्ड - बाईट ANUP PETKAR - - - -**

यानिमित्तानं केंद्र सरकारच्या वतीनं प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत दिलं जाणारं अपघाती विमा सुरक्षा कवच, आणि प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना याविषयी प्रधानमंत्र्यांनी माहिती दिली.

समाजातल्या अंधश्रद्धेच्या धोक्यांचा उल्लेखही प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मध्ये केला.

**- - - - होल्ड - MKB ANDHASHRADDHA - - - -**

विज्ञान, अनुभव आणि तर्काच्या आधारे अंधश्रद्धेला आव्हान देणाऱ्या पूर्णिमा देवी बर्मन यांचं प्रेरणादायी उदाहरणही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडलं. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पर्यावरण स्वच्छ ठेवण्यास मदत करणारा मात्र आसाममध्ये काही ठिकाणी अशुभ मानला जाणारा हरगिल हा दुर्मिळ पक्षी कशा रीतीनं अनेक गावांचं प्रतीक बनला, याबद्दल त्यांनी सांगितलं. ज्यावेळी समाजापर्यंत अचूक माहिती दिली जाते, तेव्हा जुनाट विचारांतही बदल घडून येतात, असं ते म्हणाले.

आगामी गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनलेल्या मूर्ती खरेदी करू नयेत असं आवाहन त्यांनी केलं. मातीच्या मूर्ती पाण्यात सहजपणे विरघळत असल्यानं आपले जलस्त्रोत आणि पर्यावरणाचं रक्षण होतं, आणि त्यासोबतच आपली श्रद्धाही टिकून राहते असं ते म्हणाले.

**<><><><><>**

'विकसित भारत २०४७' हे स्वप्न साकार करण्यासाठी खेड्यांचा विकास केंद्रस्थानी असल्याचं केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. विकसित भारत ग्रामीण योजनेसाठी ग्रामविकास मंत्रालयानं राज्य सरकारांच्या

सहभागानं एक लाख ५१ हजार कोटी रुपयांहून अधिक तरतूद केल्याची माहिती त्यांनी नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय ग्रामीण विकास संमेलनात दिली.

ग्रामपंचायतींना बळकटी देण्यासाठी आर्थिक सहाय्य यापुढेही सुरू राहील, असं ते म्हणाले. ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत १० कोटींहून अधिक महिला बचत गटांशी जोडल्या गेल्याचं त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमुळे ग्रामीण रस्ते आणि पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात सुधारल्याचाही त्यांनी उल्लेख केला. यावेळी चौहान यांच्या हस्ते ग्रामीण अंतर्गत लेखापरीक्षण पोर्टलचं उद्घाटन करण्यात आलं.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर निर्मितीसाठीच्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्या असून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. वाढवण बंदराच्या कामाची पाहणी केल्यानंतर ते आज बातमीदारांशी बोलत होते. जमीन संपादनाची काही कामं राहिली आहेत, स्थानिकांना विश्वासात घेऊन ती कामं पूर्ण केली जातील, असं मुख्यमंत्री म्हणाले. बोईसर मधलं बुलेट ट्रेन स्टेशन, प्रस्तावित विमानतळ आणि मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गाच्या कामाचाही मुख्यमंत्र्यांनी आज आढावा घेतला.

<><><><><>

आषाढी वारीच्या काळात भाविकांना दर्जेदार सुविधा देतानाच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावं, अशा सूचना ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या आहेत. आषाढी वारी २०२६च्या तयारीचा आढावा घेत त्यांनी वाखरी पालखीतळ, भक्ती सागर अशा ६५ एकर परिसराची आणि चंद्रभागा नदीपात्राची पाहणी केली.

<><><><><>

राज्यातल्या शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याच्या प्रकरणात शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी मुंबई युवक काँग्रेसनं आज मंत्रालयासमोर तसंच शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या शासकीय निवासस्थानासमोर आंदोलन केलं. युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्वात हे आंदोलन झालं. आंदोलकांनी सरकारविरोधात घोषणाबाजीही केली.

<><><><><>

देशभरात आज पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेंतर्गत राज्यात सर्वत्र पाच वर्षांपर्यंतच्या बालकांचं लसीकरण केलं गेलं. पोलिओची लस देण्याकरता ठिकठिकाणी बूथ उभारण्यात आले, ट्रांझिट बूथ, फिरती पथकंही कार्यान्वित करण्यात आली.

**यवतमाळ** जिल्ह्यात आज जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी या मोहिमेचं उद्घाटन केलं. जिल्ह्यात दोन लाख पाच हजार एकशे सत्तावीस बालकांना पोलिओ लस देण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आलं.

**रत्नागिरीत** पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा प्रारंभ झाला. जिल्ह्यात ५८ हजार ८१५ बालकांच्या लसीकरणाचं उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवलं आहे.

**नांदेड** जिल्ह्यातल्या ३ लाख ८८ हजार बालकांना पोलिओचा डोस देण्याचं उद्दिष्ट असल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली.

**बीड** जिल्ह्यात भाजप आमदार नमिता मुंदडा आज राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान २०२६ निमित्त नागरी रुग्णालय, अंबाजोगाई इथं आयोजित पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी झाल्या.

**गडचिरोली इथं** आमदार डॉ. मिलिंद नरोटे आणि नगराध्यक्षा ॲड. प्रणोती निंबोरकर यांच्या हस्ते मोहिमेचं उद्घाटन झालं.

**सोलापूर** जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते वाखरीत राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेची सुरुवात झाली. जिल्हा प्रशासनातर्फे ठिकठिकाणी पोलीओ लसीकरणासाठी व्यापक सिद्धता करण्यात आल्याचं आमच्या प्रतिनिधींनी कळवलं आहे.

**लातूर** जिल्ह्यात शिरूर ताजबंद इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते बालकांना पोलिओचे डोस पाजून लसीकरण मोहिमेचं उद्घाटन करण्यात आलं. जिल्ह्यात आज राबविण्यात आलेल्या पोलिओ लसीकरण मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**नाशिक** महानगरपालिका क्षेत्रातही दोन लाख बालकांच्या लसीकरणाचं उद्दीष्ट ठेवून लसीकरण मोहीम राबवण्यात आली.

**<><><><><>**

वाशीम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर शिवनी टोल नाक्याजवळ झालेल्या अपघातात एकाच परिवारातल्या ५ जणांचा मृत्यू झाला. चंद्रपुरवरून अकोल्याकडे जाणारी एक मोटार आज सकाळी एका ट्रकच्या मागच्या बाजूला जोरात धडकल्यानं हा अपघात झाला. यात मोटारीतले पाच जण मृत्युमुखी पडले.

<><><><><>

राजगड किल्ला पाहण्यासाठी मुंबईतल्या अंधेरी परिसरातून निघालेल्या पर्यटकांच्या बसला पाबे घाटात भीषण अपघात झाला. चालकाचं नियंत्रण सुटल्याने बस थेट खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेत २ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बसमधे २० प्रवासी होते. दरीत अडकलेल्यांना बचाव पथकानं बाहेर काढलं. पोलीस तपास सुरु आहे.

<><><><><>

राज्य शासनाच्या कृषीविभागातर्फे १ जुलैला राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. या सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शेती, कृषि संलग्न क्षेत्र, फलोत्पादन, सेंद्रिय शेती, कृषी विस्तार आणि विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, संस्था तसंच कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव होणार आहे अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

<><><><><>

शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या पाणी फाऊंडेशनच्या 'सत्यमेव जयते फार्मर कप' या स्पर्धेचा उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते प्रारंभ होत आहे. या स्पर्धेच्या सहाव्या टप्पयामध्ये २५ हजार ८२३ शेतकरी सहभागी होत आहेत, असं कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज सांगितलं.

<><><><><>

भारत आणि आर्यलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना आज बेलफास्ट इथं सुरु आहे. या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. त्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी केवळ २१ धावांतच आर्यलंडच्या दोन्ही सलामवीरांना माघारी धाडलं.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा १४ षटकात आर्यलंडच्या ३ बाद १०४ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//